साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

✲ परळी वैजनाथ ✲ सोमवार, दि. २६ मे २०२५ ✲ पाने-४ ✲ २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...

न्यू सुधांशू प्रिंटर्स

श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075

कापडी पिशव्या छापून मिळतील.

# रेल्वे उड्डाणपुलाच्या कामामुळे पंढरपूरला आषाढीवारीला जाणाऱ्या दिंड्यांची होणार मोठी गैरसोय; बस, रिक्षाची भाडेवाढही होणार



परळी वैजनाथ, (लक्ष्मण वाकडे):- पंढरपूरच्या आषाढी यात्रेच्या तोंडावरच परळीतील रेल्वे उड्डाणपुलाच्या दुरूस्तीचे काम काढल्याने या शहरात येणाऱ्या छोट्या-मोठ्या दिंड्या, वारकऱ्यांची मोठी गैरसोय होणार आहे. तर थर्मलकडे जाण्याचा मार्ग बदलणार असल्याने व अंतर वाढ होणार असल्याने रिक्षा, बस यांची भाडेवाढही होणार आहे.

राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, लातूर यांनी परळीतील डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी रेल्वे उड्डाणपुलाच्या दुरूस्तीचे काम हाती घेतले आहे. सोमवार (दि.२६) पासून या कामाला प्रारंभ होणार आहे. या कामामुळे या पुलावरून होणारी वहातूक येत्या-एक जून पासून पुर्णपणे बंद केली जाणार आहे. पुढील महिनाभर म्हणजे ३० जून पर्यंत दिवस-रात्र या पुलाच्या दुरूस्तीचे काम चालणार आहे. महामार्ग उपविभागाच्या कार्यालयाने याबाबत माहिती दिली आहे. पुलाच्या दुरूस्तीच्या कामामुळे या रेल्वे उड्डाणपुलावरून होणारी वहातूक पुर्णपणे पुढील महिनाभर बंद केली जाणार आहे. यामुळे परळीकरांत खळबळ उडाली आहे.

रेल्वे उड्डाणपूल हा परळी शहरात येण्या-जाण्याचा प्रमुख मार्ग आहे. सिरसाळा, माजलगाव, बीड, छत्रपती संभाजीनगर तसेच गंगाखेड, नांदेड, परभणी या मार्गावरून परळी शहरात येणारी वहाने रेल्वे उड्डाणपुलावरून ये-जा करतात. शिवाय शहरातील रेल्वे उड्डाणपुलाच्या परिसरातील थर्मल, शिवाजीनगर व सभोतालच्या खेडेगावातील ग्रामस्थांना या पुलावरूनच परळीत यावे लागते. त्यामुळे वहान चालकांबरोबरच सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय होणार आहे. या शिवाय परळी शहरातील मोठ्या व प्रमुख शाळा थर्मल कॉलनीत असल्यामुळे ३० जूनपर्यंत परळी शहरातून थर्मल कॉलनीत शाळेत जाणाऱ्या-येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या स्कूलबस, रिक्षावाल्यांना गैरसोयीचा सामना करावा लागणार आहे. पुलावरील वहातूक बंद करण्यात येत असल्यामुळे टोकवाडी-जिरेवाडी भागातील वळण रस्त्याचा पर्याय वहातुकीसाठी दिला असला तरी अनेक किलोमीटर अंतर वाढणार आहे. शिवाय मोठा वेळ जाणार आहे.

येत्या सहा जुलैला पंढरपूरची आषाढी एकादशीची वारी आहे. परभणी, नांदेड, गंगाखेड, मार्गावरून तसेच विदर्भातून विठुनामाच्या गजरात पायी चालत येणाऱ्या शेकडो छोट्या-मोठ्या दिंड्या, हजारो वारकरी, त्यांची वहाने या सर्वांची पुलाच्या कामामुळे परळीत येताना गैरसोय होणार आहे. या दिंड्यांना आता वळणरस्त्यावरून जिरेवाडी, जलालपूर, शिवाजी चौक मार्गे परळी शहरात यावे लागणार आहे. साधारणतः पंधरा जूनच्या आसपास या दिंड्या परळीत येण्यास सुरूवात होणार आहे. वारकरी व दिंड्यांची गैरसोय होऊ नये म्हणून प्रशासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या जातात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, उड्डाणपुलाचे काम सुरू होत असल्याने नागरिकांना टोकवाडी, जिरेवाडी, जलालपूर, शिवाजी चौक मार्गावरून ये-जा करावी लागणार आहे. यामुळे सुमारे दहा किलो मीटर अंतर वाढणार असल्याने बस, रिक्षावाल्यांना भाडेवाढ करावी लागणार असल्याचे सांगितले जात आहे. ✲✲✲

# मान्सून आला..पण वेग मंदावणार.!

## खरिपाच्या पेरण्याची घाई करू नका हवामान विभागाचा सल्ला



परळी वैजनाथ, (बातमीदार):- मे महिन्याच्या भर उन्हाळ्यात गेल्या तीन आठवड्यापासून पडणारा धो-धो पाऊस, वादळी वारे, ढग, विजांचा गडगडाट यामुळे पावसाळा सुरू झाल्याचे जाणवत आहे. त्यातच यंदा मान्सून नेहमीपेक्षा आठ-दहा दिवस अगोदरच दाखल झाला आहे. परंतु या मान्सूनचा वेग मंदावल्यामुळे खरिपाच्या पेरणीयोग्य स्थिती निर्माण झाली असली तरी शेतकऱ्यांनी घाई करू नये असा सल्ला हवामान खात्याने दिला आहे.

भर उन्हाळ्यात म्हणजे दहा मे पासून आपल्याकडे आवकाळी व त्यानंतर निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे वादळी वारे, ढग, विजांचा कडकडाटासह धो-धो पाऊस बरसतो आहे. यामुळे गेल्या तीन आठवड्यापासून आपण पावसाळ्याचा अनुभव घेत आहोत. त्यातच यंदा मान्सूनही सुमारे आठ ते दहा दिवस अगोदरच दाखल झाला आहे. मे महिन्यात आठ-दहा दिवस अगोदर मान्सून येण्याची गेल्या १६ वर्षातील ही पहिलीच वेळ आहे. यापूर्वी २००९ ला मान्सून असा लवकर आला होता. मान्सून ठाणे-मुंबईसह महाराष्ट्राच्या कोकण किनारपट्टीवर बरसतो आहे. त्यातच या मान्सूनचा पुढे जाण्याचा वेग मंदावल्याची माहिती हवामान खात्याने दिली आहे. परिणामी हा मान्सून महाराष्ट्रात सक्रीय होण्यास विलंब लागणार आहे. येत्या दोन दिवसानंतर राज्यात सध्या सुरू असलेले पावसाळी वातावरण कोरडे पडण्यास सुरूवात होणार आहे. त्यामुळे पुढील काळात पुन्हा तापमान वाढणार असून पाच जून नंतरच मान्सून खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात बहुतेक भागात दाखल होईल. त्यामुळे सध्या पडत असलेल्या पावसावर शेतकऱ्यांनी खरिपाच्या पेरण्याची घाई करू नये असा सल्ला हवामान खात्याने दिला आहे. ✲

### केशर आंब्याला फटका..!

मराठवाड्याचा आंबा म्हणून प्रसिद्ध झालेला केशर आंबा यंदा येण्यास व त्याच वेळी पाऊस सुरू होण्यास एकच वेळ झाल्याने अक्षयतृतीयेस दोनशे रूपये किलो असणारा केशर आंबा सध्या किलोला शंभर रूपये व त्यापेक्षा कमी दराने विकतो आहे. पावसामुळे आंब्याची चव बदलते, टिकाऊपणा कमी होतो. परिणामी मिळेल त्या भावात आंबा विकण्याचा प्रयत्न आंबा उत्पादक करत आहेत. यामुळे आंबा उत्पादकांना यंदा मोठा फटका बसला आहे.✲✲

# कृष्णगोपाल तोतला यांची न्यायाधिकरणाच्या खंडपीठावर न्यायिक सदस्य म्हणून नियुक्ती



परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील ज्येष्ठ न्यायिक अधिकारी कृष्णगोपाल श्रीनिवास तोतला यांची महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठावर न्यायिक सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे.

महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. श्री तोतला यांनी न्याय क्षेत्रात २८ वर्षांहून अधिक काळ विविध पदांवर कार्य करत न्यायदानाची उज्वल परंपरा पुढे नेली आहे. जिल्हा न्यायाधीश, अतिरिक्त सत्र न्यायाधीश व धर्मादाय आयुक्त अशा महत्त्वाच्या पदांवर त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे.

त्यांच्या या नियुक्तीमुळे छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, जळगाव, धुळे, नंदुरबार आणि अहिल्यानगर या १२ जिल्ह्यांना लाभ होणार आहे. श्री तोतला यांच्या नियुक्तीचे येथे अभिनंदन होत आहे. ✲✲✲

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार देऊन अमोल कांबळे यांचा गौरव




परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील उर्जानगर वसाहतीतील न्यू हायस्कूल शाळेतील ज्येष्ठ शिक्षक अमोल रामराव कांबळे यांना 'विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले आहे.

येथील स्मृतिशेष ईश्वरजी कागदे सेवाभावी संस्थेच्या वतीने हा गौरव करण्यात आला आहे. श्री कांबळे यांनी सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल शाल, गौरवपत्र, स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

रविवारी (दि.२५) परळी शहरातील सिद्धार्थनगर येथील त्रिशरण बौद्ध विहार सभागृहात पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम झाला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष राहूल कागदे, सचिव सुनील कांबळे यांच्यासह ज्येष्ठ साहित्यिक डॉ.कमलाकर कांबळे, उत्तमराव कांबळे, ॲड.दिलीप उजगरे, बालाजी कांबळे, नगरसेवक सचिन कागदे, प्रा.डॉ.महेंद्र शिंदे, महादेव किरवले, रामदादा किरवले, रानबा गायकवाड, डॉ. राजेश इंगोले, नानाभाऊ हजारे, प्रा. डॉ. संजय जाधव, प्रा. डॉ. माधव रोडे, प्रा. डॉ. विनोद जगतकर, प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे, प्रा. डॉ. सचिन भंबे, प्रा. डॉ. धम्मपाल घुंबरे, प्रा. डॉ. विक्रम धनवे, प्रा. डॉ. सुजाता धनवे, आयु. चेतन चोपडे, आयु. वैभव आदोडे, ॲड. संविधान वाघमारे, आयु. बबन मस्के, आयु. प्रल्हाद आवचारे, आयु. सुधाकर सूर्यवंशी, आयु. धोंडीराम रोडे, आयु. रणजीत उपाडे, आयु. दिलीप भालेराव आदी मान्यवरांसह नागरिक यावेळी उपस्थित होते. ✲✲✲

मुलींचे शिक्षण... प्रगतीचे लक्षण..!

**संपादकीय...**

# भर उन्हाळ्यात पावसाळा..!

**✽ सुविचार ✽**
**पायाला झालेली जखम जपून चालायला शिकवते,**
**आणि मनाला झालेली जखम आयुष्य जगायला शिकवते!**


उन्हाळ्यात उन्हाची तीव्रता व तापमान दिवसेंदिवस वाढत चालले आहे. चार महिन्याचा हिवाळा आता राहिला नाही. हिवाळ्यात कडाक्याच्या थंडीचे दिवस कमी झाले आहेत. पावसाळ्याचे वेळापत्रकच बिघडले आहे. कुठे धो-धो तर कुठे कोरडेठाक. कुठे खंड तर कुठे अखंड, कुठे ढगफुटी तर कुठे नुसती बूर...बूर असे चित्र पावसाळ्यात आपण अनुभवत आहोत. अलिकडच्या काळात आपल्याकडे तिन्हीही ऋतुच्या बाबतीत बदल झाल्याचे पहायला मिळते आहे. याचा परिणाम मानवी जीवन, पर्यावरण व इथल्या हर एक घटकांवर होतो आहे. ऋतूचक्र बदलने म्हणजे भविष्यातील मोठ्या संकटाची ही चाहूल आहे असे तज्ज्ञ, जाणकार बोलून दाखवत आहेत. यामुळे सर्वांचीच चिंता वाढत चालली आहे.

एप्रिल, मे महिने आपल्याकडे तीव्र उन्हाळ्याचे. या दोन्ही महिन्यात मोठे ऊन असले तरी शेतकरी शेतीच्या पेरणीपूर्व मशागतीची कामे करत असतात. या काळात शेतजमीनीही कडक उन्हामुळे शेकून निघतात. याचा फायदा पिकाच्या वाढीसाठी होत असतो, असे शेतकरी सांगतात. यंदा मात्र मे महिन्याच्या भर उन्हाळ्यात आपल्याकडे पावसाळयासारखा पाऊस सुरू झाला आहे. मे महिन्याच्या सुरूवातीपासून वादळी वारे, विजांचा कडकडाट, ढगांचा गडगडाट व धो-धो पाऊस बरसतो आहे. यामुळे मे च्या भर उन्हाळयात आपण सर्वजण जुलै-ऑगस्ट सारख पावसाळा अनुभवतो आहोत. या पावसाळी वातावरणाचा परिणाम ऊन आणि तापमानावर होऊन भर उन्हाळ्यातील चटके देणारे कडक ऊन व हैराण करणारे मोठे तापमान गायब झाले आहे. मुसळधार व धो-धो पाऊस पडत असल्याने नदी-नाले प्रवाहीत झाले आहेत. काही नद्यांना तर पूर आले आहेत. नदीपात्रात बांधलेले छोटे मोठे बंधारे भरले आहेत. सखल भागात पाणी साचले आहे. सखल जमीनी, डोंगरदऱ्या हिरव्या झाल्या आहेत. झाडे झुडपे नवे पाणी पिऊन तजेलदार दिसत आहेत. पावसाची बूर...बूर अनेक तास सुरू रहात आहे. पहाटे धुके दाटून आलेले दिसत आहे. मे च्या भर उन्हाळ्यात पावसाळयाचा हा अनुभव अनेकजण प्रथमच पहात आहेत. वयोवृद्ध जुनी मंडळीही याला दुजोरा देत आहेत. उन्हाळ्यात अधून मधुन अवकाळी पावसाच्या सरी पडत. विजाही कडकडत, परंतु असा पावसाळा आम्ही कधी बघीतला नाही. असे ही मंडळी सांगते आहे.

यंदा मान्सून लवकर व भरपूर असा हवामान खात्याने व हवामान अभ्यासकांनी अंदाज दिला. मे च्या उन्हाळ्यातच पाऊस सुरू झाला. समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे वातावरणात बदल होऊन पाऊस पडत आहे. मे अखेर पर्यंत असे चित्र असणार आहे असे सांगितले जाते आहे.

या पावसामुळे ग्रामीण भागात मोठी धांदल उडाली आहे. मशागतीची कामे खोळंबली आहेत. बागायती पिकांचे नुकसान झाले आहे. वाळवत ठेवलेल्या कांदा व इतर शेतमालाच्या उत्पादनाला मोठा फटका बसला आहे. आंबा, टरबूज, खरबूज उत्पादकांचे या पावसामुळे मोठे नुकसान केले आहे. मराठवाड्यात अलिकडच्या काळात मोठ्या प्रमाणात पिकणारा केशर आंबा बाजारात येण्यास व हा पाऊस सुरू होण्यास एकच वेळ झाल्याने शेतकऱ्यांना केशर आंबा बेभाव विकावा लागतो आहे. यामुळे त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. एकूणच उन्हाळ्यात पडणारा पाऊस व बदलत चाललेले ऋतूचक्र ही भविष्यातील हवामान बदलाची व संकटाची मोठी घंटा आहे. त्यामुळे वेळीच सावध होणे व वाढते तापमान, प्रदूषण रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. वृक्षारोपणाची व्यापक मोहीत हाती घेणेही तेवढेच महत्वाचे आहे. ✽✽✽

# सर्दी तर होणारच ना...!



पावसाळा आला की पावसाळी छत्र्या येणारच असं मराठीत गंमतीने म्हटलं जातं आणि ते देखील खरच आहे. जंगली मशरूम अर्थात पावसाळी छत्री या आशयाने इथं अर्थ घेतला जात असतो. मात्र येणाऱ्या पावसासोबत ज्या काही गोष्टी समोर येतात त्यात पावसाळ्यात होणारे आजार अर्थात साथरोग देखील येऊ शकतात आणि साथरोगाची ही आपत्ती रोखली नाही तर मोठा गोंधळ निर्माण होतो.

पावसात भिजल्यानंतर सर्दी होणे (लेाेप लेश्रव) हे अगदी सहाजिक आहे. प्रत्येक वेळी आपण छत्री अथवा रेनकोट घेऊन फिरत नाही आणि अनेकदा वाहनाच्या डिक्कीतला रेनकोट परिधान करेपर्यंत आपण भिजलेलो असतो. लहान बालकांची प्रतिकारशक्ती तुलनेत कमी असली तरी त्यांना याचा धोका कमी आहे. मात्र तथापि दुसऱ्या बाजूस घरातून पालकांकडून याचा प्रसार होऊ शकतो.

साधारणपणे सर्दी-पडसे हा पावसाळ्यातील सवयीचा आजार आहे आणि त्यावर मुख्यतः घरगुती इलाज होताना दिसतात. स्वतःहून औषधे घेणे आणि मुलांना देणे असे प्रकार प्रचलीत आहेत. अनेकदा टि.व्ही. वरील जाहिराती बघुनही औषधे घेतली तसेच दिली जाताना दिसतात परंतु नेमकेपणाने निदान करून मगच औषधे घ्यावीत हे उत्तम.

विविध प्रकारच्या औषधांचा स्वतःहून वापर करणे कुणासाठीही धोकादायकच म्हणावे लागेल कारण या औषधांचे चांगले परिणाम होवून आजारातून बरे होता येईल ही अपेक्षा असते. मात्र या प्रकारच्या औषधांचे दुष्परिणाम काय होतात याची माहिती नसल्याने त्याचा उलटा परिणाम होवू शकतो. आरोग्यासाठी हा धोका पत्करू नये.

आपल्याकडे निष्काळजीपण, दुर्लक्ष करणे आणि दुखणे अंगावर काढणे असेही प्रकार दिसून येतात. यातूनही आजारपण वाढू शकते. त्यामुळे आजारी पडल्यावर न चुकता वैद्यकीय सल्ला घेणं केव्हाही उत्तम. आपले शरीर मुख्यत्वे पाण्यावर अवलंबून असते. आणि पावसाळ्यात जे आजार आढळून येतात त्यापैकी साधारण ७० टक्के, आजार हे पाण्यामुळे होतात. त्यात पाण्यातील जिवाणुंमुळे होणारे आजार वेगळे आणि विषाणुंमूळे होणारे आजार वेगळे आहेत. या सर्वांचे मुळ अर्थात पाणी हेच आहे. पावसाळ्यात अनेक विषाणू सक्रिय होतात. त्यामुळे शुद्ध पिण्याचे पाणी हा आजारांना दूर ठेवण्याचा सर्वोत्तम उपाय आहे. पावसाळ्यात अनेक ठिकाणी जलसाठे दुषित होतात. त्यामुळे आजारांचा धोका वाढत असतो. घरात पिण्याचे पाणी उकळून ते थंड करून घेणे चांगले. पाणी उकळल्याने त्यातील सर्व जिवाणू, विषाणू मरतात. त्यामुळे ज्या ठिकाणी शुद्ध पाणी नाही त्या ठिकाणी पाणी उकळूनच प्यावे.

पाण्यातील अशुध्दपणा दूर करण्याचा आणखी एक उपाय म्हणजे तुरटीचा वापर करणे होय. बाजारात तुरटी सहजरित्या उपलब्ध असते. कोणत्याही किराणा दुकानात ती आपणास खरेदी करता येईल. पाण्यात तुरटी फिरविल्यास गाळ खाली बसेल नंतर त्याचा वापर करता येईल. पाण्यात तुरटी फिरवणे सर्वच अर्थाने आपल्या आरोग्यासाठी सहाय्यकारी ठरणार आहे. तुरटीच्या पाण्याने अंघोळ केल्यास त्वचेवर होणारा संसर्ग कमी होतो. हे पाणी त्वचेतील मृतपेशी काढून टाकण्यास मदत करते. जखम लवकर भरणे आणि संसर्ग कमी करणे या दोन्हींमध्ये तुरटी लाभदायक आहे. आला पावसाळा म्हणजे आरोग्य सांभाळा असाच संदेश मानून पावसात भिजण्याचा आनंद घ्यायला देखील हरकत नाही.

**– प्रशांत विजया अनंत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी, बीड

# जगण्यात बदलांची गती असावी...

सध्या आपलेपणाभोवती स्वार्थाची चौकट उभी राहते आहे. या चौकटीने माणसाची आतले एक आणि बाहेरचे एक अशा दोन जगात विभागणी केलीय. आपलेपणाच्या ओलाव्यातून पाझरणारा माणुसकीचा झरा हळु हळु आटत चालला आहे. बाहेरचं जग माणसांना सैरभैर करते आहे. काहीतरी शोधण्यासाठी माणसे वेड्यासारखी धावत आहेत. धावताना सैरभैर होत आहेत. धावून धावून दम लागत आहे, तरी सुखांच्या मृगजळाचा वारू काही केल्या थांबत नाही ,तो धावतो आहे....तोंडाला फेस येईपर्यंत. आपण असे का धावत आहोत? आपणास काय हवे? या प्रश्नाची उत्तरे शोधण्याची गरजच उरली नसल्यासारखे. अर्थात याला काही अपवाद जरूर आहेत; पण अपवाद म्हणजे काही नियम नसतो. कालाय तस्मै नमः म्हणतात. काळाची गती जाणून प्रगती करतो तो टिकतो बाकी संपतात, हे मान्य. पण काळ कितीही अनंत, अगाध असला तरी त्याच्या पोटातुन निर्माण होणारा स्नेह, सात्विकता, संस्कार, सौंदर्य हे संस्कृतीचं देणं असतं. संस्कृतीने हाती दिलेलं हे पाथेय सोबत घेऊन जगण्यात प्रकटणारा साधेपणा हीच माणसांची खरी दौलत असते. माणसांच्या जगण्यात बदलांची गती असावी, प्रगतीही असावी; पण शेकडो वर्षाच्या मंथनातून हाती लागलेल्या मूल्यांचं मोल देऊन नाही.




**– संग्राहक : शाहूराज येवते,**
परळी वैजनाथ.

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**

# श्रीक्षेत्र परळी वैद्यनाथ ज्योर्तिलिंग तीर्थक्षेत्र विकास कामांचा घेतला आढावा

## श्रीक्षेत्र परळी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकासासाठी सर्वोतोपरी सहकार्य-उपमुख्यमंत्री अजित पवार








परळी वैजनाथ, (जि.मा.का.):- श्रीक्षेत्र परळी वैद्यनाथ ज्योर्तिलिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी सांगितले. विकास आराखड्यातील कामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही मात्र कामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण झाली पाहिजेत असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी आज परळी येथे प्रभु वैद्यनाथचे दर्शन घेतले. त्यानंतर परळी येथील शासकीय विश्रामगृहातील सभागृहात त्यांनी श्रीक्षेत्र परळी वैद्यनाथ ज्योर्तिलिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार विक्रम काळे, आमदार धनंजय मुंडे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी श्रीक्षेत्र परळी येथील तीर्थक्षेत्र विकास आराखड्यामध्ये ९२ कामांना नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचे सांगितले. यावेळी आराखड्यानुसार करण्यात येणाऱ्या कामांचे सादरीकरण करण्यात आले. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात २८६.६८ कोटीच्या विविध ९२ कामांना मान्यता दिल्याचे त्यांनी सांगितले.

दर्शन मंडपाचे काम, परिसर सुधारणा, मंदिरा भोवती दगडी फरशी, वास्तुशिल्प प्रवेशद्वार, अंतर्गत विद्युतीकरण, सौर दिवे बसविणे, उद्यान विकसित करणे, संरक्षण भिंतीचे बांधकाम, वाहनतळ यासह सुरू असलेल्या विकास कामांबाबत मुख्य वास्तुविशारद कृष्णकुमार बांगड यांनी माहिती दिली.

उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, श्रीक्षेत्र परळी वैद्यनाथ हे बारा ज्योर्तिलिंगापैकी एक आहे. प्रभु वैद्यनाथाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी विकास आराखड्यातील कामेही दर्जेदार होणे अत्यंत आवश्यक आहे. कामाच्या गुणवत्तेबाबत प्रत्येकाने बारकाईने लक्ष घालणे आवश्यक आहे. मंदिर परिसरातील स्वच्छता, निटनेटके पणा, सर्व सोई सुविधांयुक्त दर्शन मंडप, तसेच तीर्थक्षेत्र बालाजी, शिर्डी तसेच पंढरपूरच्या धर्तीवर भविष्यात भाविकांना सर्व सोईसुविधा देण्यासाठी राज्य शासनाकडून यासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. राज्य शासन सर्वोतोपरी सहकार्य करेल, असे त्यांनी सांगितले.

मंदिराच्या मागील बाजूच्या जागेवर लाईट आणि साऊंड शो करण्यात येणार आहे. लेझर शो करताना किती वेळ शो असेल, त्यामध्ये भाविकांना कोणत्या बाबी दाखविल्या जातील यासह देण्यात येणाऱ्या सेवा सुविधा दर्जेदार असायला हव्यात असे त्यांनी आवर्जून सांगितले. यावेळी उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसिलदार व्यंकटेश मुंढे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे आदी विकसीत होते.

***

### औष्णिक विद्युत केंद्राचा उपमुख्यमंत्र्यांकडून आढावा

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी आज परळी औष्णिक विद्युत केंद्रा अंतर्गत सुरू असलेल्या कामकाजाचा आढावा घेतला.

शासकीय विश्रामगृह येथे आयोजित आढावा बैठकीला पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार विक्रम काळे, आमदार धनंजय मुंडे आदी उपस्थित होते.

यावेळी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे यांनी सादरीकरणाद्वारे औष्णिक विद्युत केंद्राबाबत माहिती दिली. यामध्ये प्रस्तावित संच क्रमांक-१ ची मंजुरी व उभारणी, सौर ऊर्जा प्रकल्प मान्यता, राखेचे प्रदूषण व उपाययोजना, औष्णिक विद्युत केंद्राच्या विश्रामगृहाचे नुतनीकरण, थर्मल परिसरात स्वतंत्र पोलीस ठाणे, थर्मल कॉलनी परिसरात वृक्ष लागवड, सौर ऊर्जा प्रकल्प, आदी विषयांबाबत आढावा घेण्यात आला. परळी औष्णिक विद्युत केंद्राबाबत असलेल्या अडचणी सोडविण्यासाठी आपले सहकार्य असेल असे श्री.पवार यांनी सांगितले. यावेळी उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसिलदार व्यंकटेश मुंढे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे आदी विकसीत होते. ***

### श्री पवार यांनी घेतले प्रभू वैद्यनाथाचे दर्शन

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारा ज्योर्तिलिंगापैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेऊन विधिवत पूजा केली. तसेच मंदिर परिसरात सुरू असलेल्या विकास आराखड्यातील कामांची पाहणीही त्यांनी केली.

यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार विक्रम काळे, आमदार धनंजय मुंडे, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्री.पवार यांच्या हस्ते यावेळी अभिषेक करण्यात आला. मंदिर देवस्थानच्या वतीने उपमुख्यमंत्री श्री.पवार, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे तसेच लोकप्रतिनिधी यांचा सत्कार करण्यात आला. ***

## परळी शहरात प्रभाग निहाय स्वच्छता करा-चेतन सौंदळे

परळी वैजनाथ (बातमीदार):- मोसमा आधीच्या पावसानेच परळी शहरातील नाल्या व गटारीतील पाणी रस्त्यावर येवून पाण्याचा निचरा होत नसल्यामुळे नागरिकांना अनेक प्रभागात गैरसोयीचा सामना करावा लागत आहे त्यामुळे नगर परीषदे मार्फत तात्काळ प्रभागनिहाय नालेसफाई व स्वच्छता मोहिमेद्वारे गटारी सांडपाणी वाहिन्यांचे प्रवाहीकरण तसेच नागरिकांच्या अडचणी व तक्रारीचे निवारण हेल्पलाईन क्रमांकाद्वारे करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा माजी नगरसेवक चेतन सौंदळे यांनी परळी नगर परीषद मुख्याधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.



याबाबत नगरपालिका प्रशासनाच्या वतीने अधिक्षक श्री.संतोष रोडे यांनी निवेदन स्वीकारून तात्काळ उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले आहे. निवेदनात परळी शहरातील ओढे,मोठया नाल्या व नदीकाठी राहणा-या तसेच शहरी वस्तीभागातील सर्व प्रभागात तात्काळ नालेसफाई व स्वच्छता मोहिम राबवून नागरिकांच्या मुलभूत गरजांकरिता यामध्ये प्रामुख्याने स्वच्छता,पिण्याचे पाणी,पथदिवे,रस्त्यावरील खड्डे बुजविणे तसेच आपत्कालिन परीस्थितीत अडचणी व तक्रारीचे निवारण व्हावे याकरिता नागरिकांसाठी नगरपालिका प्रशासना मार्फत हेल्पलाईन क्रमांकाद्वारे दखल घेण्याची मागणी चेतन सौंदळे यांनी केली आहे.**

## जिल्हा हद्दीत ३ जूनपर्यंत ड्रोन कॅमेरा, मानवविरहीत यंत्र उडविण्यास मनाई

बीड, (जि.मा.का.):- भारतीय सैन्याकडून पहलगाव येथील दहशतवादी हल्ल्याचे नंतर ऑपरेशन सिंदुर राबवुन पाकिस्तान मधील दहशतवाद्यांची ठिकाणे नष्ट करण्यात आलेली आहेत. यामुळे स्लीपर सेल सक्रिय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांचे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून ड्रोन कॅमेरा, मानवविरहित यंत्र चालविण्यास, उडविण्यास मनाई करणेबाबत दिनांक १४ मे ते ३ जून २०२५ पर्यंत भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १६३ लागू करणे बाबत राज्य गुप्तवार्ता विभाग मुंबई यांनी कळविले आहे. सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता नागरिकांचे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून संपूर्ण बीड जिल्ह्यात दिनांक १४ मे २०२५ पासून ते ३ जून २०२५ पर्यंत तातडीचे परिस्थितीत, नमूद कालावधी करिता भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १६३ (१)(३) अन्वये आदेश लागू करणेस विनंती करण्यात आली आहे. तरी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) मधील शक्तीचा वापर करून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून बीड जिल्हा हद्दीत दि. १६ मे २०२५ ते ३ जून २०२५ या कालावधीत ड्रोन कॅमेरा, मानवरहीत यंत्र चालविण्यास किंवा उडविण्यास मनाई आदेश एकतर्फी पारीत करण्यात येत आहे, असे बीडचे अपर जिल्हादंडाधिकारी यांनी नमुद केले आहे. ***

### दरवळणारा सुगंध...

*जीवनामध्ये अडचणी कितीही असो, चिंता केल्यावर त्या अजून जास्त होतात, शांत राहिल्यावर त्या कमी कमी होतात, संयम राखल्यास त्या संपून जातात, आणि स्वत:वर विश्वास ठेवला तर अडचणी आनंदात बदलून जातात..!*

## पॉवरलूम भागातील रोहित्र झाडी, वेलीतून मुक्त करा-शिवाजी पालाकुडतेवार

परळी वैजनाथ, (बातमीदार):- शहरातील पावरलुम भागातील रोहित्र आजुबाजुच्या झाडे,वेलींनी झाकुन गेले आहे.महावितरण व नगरपालिकेचे प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याने या झाडे,वेलींमध्ये विजप्रवाह उतरुन नागरीकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.या रहित्राला झाडी,वेली व कचर्यापासुन मुक्त करावे अशी सामाजीक कार्यकर्ते शिवाजी पालाकुडतेवार यांनी केली आहे.

शहरातील पावरलुम भागात असलेल्या एकाच जागेवर लगत दोन रोहित्र आहेत.या रोहित्रावरुन पावरलुम, नाथ नगर, शिवाजी नगर, माणिकनगर या भागात विजपुरवठा होतो.या दोन्ही रोहित्रांना सध्या झाडे व वेलींनी घेरले आहे.हे रोहित्र रस्त्यावर असल्याने या ठिकाणी कायमची रहदारी असते तर रोहित्राजवळ कचर्याचे ढिग साचले आहेत. याठिकाणी कुठलेही कुंपण नसल्याने मोकाट जनावरे,डुक्कर असे प्राणी रोहित्राजवळ येतात रोहित्रांभोवती झाडांचे जंगल बनले आहे तर वेली पोलवरुन वेली तारापर्यंत गेल्याने विजप्रवाह उतरुन जिवितास धोका निर्माण झाला आहे.या भागातील नागरीकांनी महावितरण व नगरपालिका प्रशासनास कळवुनही सदरील रोहित्र झाडांमधून मुक्त न केल्याने नागरीक जीव मुठीत धरुन वागत आहेत.सदरील रोहित्राला झाडी,वेली व कचर्यापासुन मुक्त करावे अशी सामाजीक कार्यकर्ते शिवाजी पालाकुडतेवार यांनी केली आहे.

***

### खरय..पण...

**देवाने आपल्या शरीराची रचनाच अशी केली आहे की, आपण स्वत:ची पाठही थोपटू शकत नाही आणि स्वत:ला लाथही मारू शकत नाही. म्हणूनच तर माणसाला 'हित-चिंतकांची' आणि 'निंदकांची' नेहमीच आवश्यकता आहे.**



# परळी आगारात नव्या दहा लालपरी! मान्यवरांच्या उपस्थितीत नव्या बस प्रवाशांच्या सेवेत रुजू

परळी वैद्यनाथ (बातमीदार):- परळी वैद्यनाथ मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून परळी हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे स्थान असल्याने येथील एसटी महामंडळाच्या आगारात नव्या दहा लाल परी बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या असून या बसेसचे युवक नेते अजय मुंडे यांच्या सह मान्यवरांच्या हस्ते व महामंडळाच्या अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पूजन करून लोकार्पण करण्यात आले.

बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे स्थान असलेल्या परळी आगारात ये-जा करणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक असल्याने येथे नवीन २० बसेसची मागणी धनंजय मुंडे यांनी केली होती. त्यापैकी महामंडळाच्या वतीने सध्या दहा नवीन बसेस उपलब्ध करून दिल्या आहेत.

या बसेसचे आज विधिवत पूजन करून लोकार्पण करण्यात आले, यावेळी अजय मुंडे यांच्या सह मान्यवर पदाधिकारी व नागरिकांनी नवीन बस मधून फेरफटका मारला. यावेळी अजयजी मुंडे यांच्या सह राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, प्रा. विनोद जगतकर, बालाजी उर्फ पिंटू मुंडे, सुरेश टाक, के डी उपाडे, एजाज शेख, अनंत इंगळे, नितीन कुलकर्णी, शंकर कापसे, वसंत तिडके, संजय आघाव, सय्यद सिराज, दीपक तांदळे, रवी मुळे, अविनाश गवळी, सय्यद मुसा, रवी आघाव, महेंद्र रोडे, दत्ताभाऊ सावंत, गिरीश भोसले, गणेश सुरवसे, यांसह पदाधिकारी तसेच परळी आगाराचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. **

# 'बीड' संग्राह्य असे कॉफी टेबल बुक-ना.अजित पवार



बीड, (जि.मा.का.):- बीड जिल्ह्याची सचित्र आणि उत्तम अशी मांडणी कॉफी टेबल बुकच्या माध्यमातून करण्यात आली आहे. हे पुस्तक कुणालाही आपल्या संग्रही ठेवावे असे वाटेल असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी बीड या पुस्तकाच्या विमोचन प्रसंगी केले. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांची आमदार धनंजय मुंडे उपस्थित होते. बीड जिल्हा माहिती कार्यालयातर्फे नियोजन निधीतून हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. जिल्हा नियोजन समितीच्या आज झालेल्या बैठकीत हा विमोचन सोहळा पार पडला.

यावेळी व्यासपीठावर उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने तसेच पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, आमदार सुरेश धस, आमदार प्रकाश सोळंके, आमदार नमिता मुंदडा, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार विजयसिंह पंडित आदींची यावेळी विशेष उपस्थिती होती.*

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे परळी भाजपाच्या वतीने स्वागत



परळी वैजनाथ (बातमीदार):- महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांनी परळी वैजनाथ येथे सुरु असलेल्या वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत विविध विकासकामांची पाहणी केली. या दौऱ्यात त्यांच्या समवेत महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री मा. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे तसेच परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार व मंत्री मा. धनंजयजी मुंडे हे देखील उपस्थित होते.

मा. उपमुख्यमंत्री आणि अन्य मान्यवरांच्या परळी आगमनप्रसंगी शक्तीकुंज हेलिपॅडवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. स्वागतकर्त्यांमध्ये भाजपा शहराध्यक्ष सौ. उमाताई समशेटे, वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोद सामत, माजी नगरसेवक महादेव इटके, जवाहर शिक्षण संस्थेचे संचालक विजय वाकेकर आणि वैद्यनाथ साखर कारखान्याचे संचालक संदीप लाहोटी यांचा समावेश होता.

बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री असताना मा. पंकजाताई मुंडे यांच्या प्रयत्नातून वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची मुहूर्तमेढ रोवण्यात आली होती. आरंभिक टप्प्यात १३३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता, जो नंतर वाढवून २८६ कोटी रुपये करण्यात आला. या आराखड्यांतर्गत सध्या विविध विकासकामांना गती मिळाली असून, भक्तनिवास, दर्शन मंडप, भाविकांसाठी सुविधा केंद्र, सुशोभीकरण यांसारखी कामे मोठ्या प्रमाणावर सुरु आहेत. या कामांमुळे वैद्यनाथ मंदिर परिसरात भाविकांना दर्जेदार सुविधा मिळतील, तसेच मंदिराचे पौराणिक व ऐतिहासिक महत्त्व कायम राखून विकास साधला जाईल, असे मा. मंत्री महोदयांनी यावेळी सांगितले. ***

**बचत विजेची समृद्धी राष्ट्राची !**

**हसरा कोपरा..!**

यंदाचा मान्सून
मराठवाड्यात
सुरू होऊन मगच
केरळ मार्गे
अंदमान निकोबार कडे
जाणार असे दिसतेय!

# मंत्री पंकजा मुंडेंविषयी आक्षेपार्ह व्हीडीओ टाकला; एकाविरुद्ध गुन्हा दाखल

परळी वैजनाथ, (बातमीदार):- राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्याविषयी आक्षेपार्ह व्हीडीओ तयार करुन व्हायरल केल्याप्रकरणी सिरसाळा येथे एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, सिरसाळा येथील आरोपी मतिन मणियार याने राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा भाषणाचा व्हिडिओ व त्यामध्ये चारही कोपर्यात अश्लील फोटो लावून तो व्हिडिओ 'ग्रामपंचायत सिरसाळा' या वॉटसअँप ग्रुपमध्ये प्रसारी केला.याप्रकरणी नसीब रहीम शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सिरसाळा पोलीस ठाण्यात गु.र.नं. १३८/२०२५ कलम-६७(अ) माहीती तंत्रज्ञा अधिनियम सह कलम २९६ भान्यासं २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोनि उस्मान शेख पो. स्टे. सायबर बीड हे करीत आहेत. ***

